<u>**Washim District Police**</u>

**Nature of work** :- Recovery of Stolen Property

**Police Station** :- Shirpur

**Date of Good Work Done: -** 29/08/2017

## Brief of the work done :-

In the area of PS Shirpur on Dated 29/07/2017 While Complainant named Dilip Sitaram Maind And Ganesh Lahane was going towards Dongaon from Kenwad after closing their Jewelry shop situated at Kenwad. Then two unknown accused stopped their Motor cycle and by threatening them by knife still Bag of Golden & Silver ornaments. A crime is registered at Shirpur Cr.no. 156/17 U/s 394, 397, 34 IPC

Then Under the Guidance of SP Mokshada Patil Mam and Addl SP Swapna Gore team led by PSO Shirpur PI Harish Gawali and LCB PI Dukare Patil after continuously searching them and getting their call details they found that criminals are from other Dist. Then Team took Roshan Maske & Shubham Wanjari in custody from Yavatmal and interrogate them and they committed the robbery then they recovered stolen property of about 209 Gr. Golden metal ornaments, 4kg. 300 gr. silver metal ornaments total of Rs. 7 Lac 65 from Cave in Chausala Village, Yavatmal

The Team include SDPO Washim Kiran Dhatrak, LCB PI Dukare Patil, PSO PI Harish Gawali, PSI Togarwad, PC Sunil Pawar, Santosh Paikrao, Prashant Rajguru, Rameshwar Jogdand, Shankar Dabhade, Ramesh Godghase, this resulted into a good reaction among the people of district Washim.

**Image**:-



# गुफेतून शोधला साडेसात लाखांचा मुद्देमाल

## जिल्हा पोलिस दलाची कारवाई : चार आरोपींना अटक

**वाशीम, ता. २९ :** चोरांनी चोरी केल्यानंतर सोन्या-चांदीचा मुद्देमाल तो एखाद्या सराफाकडे विकतो. पोलिसांच्या तपासाची दिशाही हीच असते. मात्र, शिरपूर ते कुकसा रस्त्यावर साडेसात लाखांच्या सोने चांदीच्या दागिन्यांची बॅग वाशीम पोलिसांनी यवतमाळ जिल्ह्यातील चौसाळा गावाजवळील एका गुफेतून हस्तगत केली आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील डोणगाव येथे राहणारे व केनवड येथे सराफा व्यवसाय करणारे विश्वेश सराफ यांच्या दुकानातील दिलीप सिताराम मैद व गणेश लहाने हे केनवड येथील दुकानातील सोनाचांदीची बॅग घेऊन डोणगावकडे जात असताना २९ जुलै रोजी सायंकाळच्यावेळी दोन अज्ञात आरोपींनी त्यांना अडवून चाकुचा धाक दाखवून बॅग लंपास केली होती. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. शिरपूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविल्यानंतर ठाणेदार हरिष गवळी यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांच्या मार्गदर्शनात तपास सुरू केला असता तसेच स्थानिक गुन्हे शाखेने व सायबर शाखेने यामध्ये बारीक तपशील पाहिला असता गुन्हेगार हे परजिल्ह्यातील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यावरून यवतमाळ येथील रोशन मस्के व शुभम वंजारी यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. यवतमाळ जिल्ह्यातील चौसाळा गावाजवळील गुफेतून २०९ ग्रॅम सोन्याचे दागिने, चार किलो ३०० ग्रॅम चांदीचे दागीने असा सात लाख ६५ हजाराचा मुद्देमाल काढून दिला. या प्रकरणामध्ये पोलिसांनी दुकानात काम करणारा दिपक नवले, विशाल पांडव व एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले होते. अल्पवयीन मुलाला त्याच्या पालकाच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील, अतिरिक्त पोलिस अधीक्षक स्वप्ना गोरे, उपविभागीय पोलिस अधीक्षकारी किरण धात्रक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रकाश डुकरे पाटील, ठाणेदार हरीश गवळी, पोलिस उपनिरीक्षक गिरीश तोगडवार, पोलिस शिपाई सुनील पवार, संतोष पाईकराव, प्रशांत राजगुरू, रामेश्वर जोगदंड, शंकर दाभाडे, रमेश गोडघासे यांच्या पथकाने केली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

**वाशीम : सोन्या-चांदीच्या मुद्देमालासह अटक केलेले आरोपी.**